क्रमांक : ९०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## सोमवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ / भाद्रपद ४, शके १९४६

### ९०. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २६६ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १२४ निवेदने मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण १४२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४४ निवेदने सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक २६ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ८ सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ३७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण ९० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०६ सोमवार, दिनांक १३ जून, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ४२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ८४ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १० निवेदने शाखेत प्राप्त झाली उर्वरित प्रलंबित ७४ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्माननीय विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २६ ऑगस्ट, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

याची प्रत :

१. संगणक कक्ष (website.)
२. अनुवाद कक्ष
३. प्रतिवेदन

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्र. १७३२

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**ॲड. अशोक पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पुणे जिल्हयातील वाघोली गावाचा सुमारे दोन वर्षापूर्वी पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला असून या गावाची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाख इतकी असणे, वाघोलीतील नागरिकांच्या मुलभूत समस्येबाबत आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांच्या कार्यालयात दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजी बैठक झालेली असणे, या बैठकीमध्ये बकोरी रोड, फुलमळा, आयव्ही इस्टेट रोड वरील हजारो नागरिकांना अरुंद रस्त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागत असणे, या रोड वरील मालक व व्यावसायिक यांच्यातील वादामुळे रस्त्यांचे रुंदीकरन न झाल्याने नागरिकांची अवस्था दयनीय असणे तसेच जलनिःसारण वाहिनी नसल्याने रस्त्यावर पाणी साचून नागरिकांना प्रचंढ मनस्ताप सहन करावा लागणे, सदरच्या जागेचे सर्व्हेक्षण करुन पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात सदरच्या जागा घेणेबाबतची चर्चा होणे, वाघेश्वर चौक ते बाईफ रोड पर्यंत सेवा मार्ग करण्याची आवश्यकता, सांडपाण्याची व्यवस्थेकरिता विकास आराखडा करुन नवीन जलनिःसारण वाहिनी तातडीने टाकण्याची आवश्यकता, यासाठी STP करिता निधीची व घनकचरा प्रकल्प उभारण्याची आवश्यकता असणे, वाघोलीमध्ये सुमारे ४७५ पेक्षा जास्त सोसायट्या असून या सोसायट्यांमधील नागरिकांना रस्ते, जलनिःसारण या सारख्या अडचणींना सामोरे जावे लागणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये दि. २१.०६.२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये २३ गावे नव्याने समाविष्ट झालेली आहे. यामध्ये वाघोली गावाचा समावेश आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या गावांकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची "विशेष नियोजन प्राधिकरण" (Special Planning Authority) म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर गावांचा विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून करण्यात येत आहे. सदरचा आराखडा अंतिम झालेला नसल्याने रस्त्यांची आखणी, रुंदी व स्थान-निश्चिती कायम झालेली नाही. या कारणांमुळे रस्त्यावरील विविध प्रकारच्या सेवावाहिन्यांची कामे प्रलंबित आहे व त्याअनुषंगाने नविन रस्ते विकसित करणे अडचणीचे होत आहे.

आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.२० सप्टेंबर २०२३ रोजी वाघोली गावातील पायाभुत सुविधा, विकास कामासंबंधी बैठक संपन्न झाली होती. या बैठकीमध्ये बकोरी रोड, फुलमळा, आयव्ही इस्टेट रोड, वाघेश्वर चौक ते बाईफ रोड पर्यंत सर्विस रस्ता करणे इत्यादी विषयावर चर्चा करून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महसुल विभाग, पुणे, जिल्हा परिषद, पुणे व पुणे महानगरपालिका, पुणे यांच्यामार्फत संयुक्तीक पाहणी करणे, सर्वेक्षण करणे, मोजणी करून जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने या प्राधिकरणांना जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे. महसूल विभाग, पुणे व पुणे जिल्हापरिषद, पुणे यांच्याकडून

जागा उपलब्ध झाल्यास महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच २०२४-२५ च्या महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये निधी उपलब्ध करून नविन रस्त्याचे विकसन करण्यात येणार आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांकरीता नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने पुणे महानगरपालिकेकडून मलनि:सारणांसाठी आवश्यक असलेल्या मलवाहिन्या डिझाईन करून व आवश्यकतेनुसार STP यंत्रणा उभारण्याकरीता डी.पी.आर. तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाची किंमत रू.१,४१७.९७ कोटी इतकी आहे. यामध्ये वाघोलीसाठी १५४.६३ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या व ५६ एम.एल.डी. क्षमतेचे २ मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प रू.३५२.०१ कोटीचे प्रस्तावित केलेले आहेत.

वाघोली गावाचे क्षेत्रफळ २८७९.९६ एकर असून या गावामध्ये सुमारे ५३१६० मिळकती आहेत. वाघोली गावात दैनंदिन अंदाजे ६५ मे.टन इतका कचरा संकलित करण्यात येतो. त्यापैकी ओला कचरा ३५ मे.टन व सुका कचरा ३० मे. टन इतका संकलित करण्यात येतो. ओला कचरा खत निर्मितीकरीता कचरा प्रक्रीया प्रकल्पांना व सुका कचरा पुणे महानगरपालिकेच्या केशवनगर येथील कचरा प्रक्रीया प्रकल्पांना देण्यात येतो. या गावाच्या साफसफाईसाठी ११० सफाई सेवकांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांच्याकडून स्वच्छता विषयक दैनंदिन कामकाज करण्यात येते. वाघोली गावात निर्माण होणाऱ्या सर्व वर्गीकृत कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाते.

वाघोली गावात निर्माण होणारा दैनंदिन कचऱ्याची वाघोली गावाच्या हद्दीमध्ये शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी वाघोली गावाचा विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर आवश्यक ती जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.६३४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. विजय वडेट्टीवार, योगेश सागर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६३४ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील कांदिवली (प.) येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड औद्योगिक वापरासाठी दिलेला असतांनाही या भूखंडाचा वापर बार, रेस्तराँ, कापड दुकाने आदिंसाठी केला जात असणे, या शासकीय भूखंडाचा औद्योगिक वापर करण्याचा आदेश महसूल विभागाने सन १९६१ मध्ये निर्गमित करणे, त्यानुसार १५० भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करण्यात आले, दरम्यानच्या काळात हे भूखंड प्रतिचौ. मीटर ६६ रुपये दराने कब्जे हक्काने व काही अटी शर्तीच्या अधीन राहून प्रदान करण्याचे आदेश देणे, २००४ मध्ये ही वसाहत उद्योग विभागाकडे हस्तांतरीत करुन तिचे व्यवस्थापन म.औ.वि.म.कडे सोपविणे, म.औ.वि.म.ने या शासकीय औद्योगिक वसाहतीचे हस्तांतरण कांदिवली को-ऑप, इंडस्ट्रियल इस्टेटकडे सोपविणे, त्यानंतर या ठिकाणी औद्योगिक वापर वगळून या भूखंडाचा वापर अनधिकृतरित्या सुरु असलेले रेस्तराँ, बार, लॉज, कपड्याचे शोरुम तसेच अनेक अनधिकृत बांधकामांसाठी होणे, या अनधिकृत बांधकामांमध्ये अनेकांनी कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करणे, औद्योगिक वापर वगळता अन्य व्यवसाय सुरु करताना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता शासकीय भूखंडाकरिता थेट पालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून परवानगी घेणे, याकडे मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष, शासकीय भूखंडाचा अन्य वापर करताना वा विक्री करताना ५० टक्के अर्नजित रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा न करणे तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेणे, परिणामी शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, याप्रकरणी तक्रार दाखल करुनही महसूल अधिकाऱ्यांकडून कारवाईबाबत दिरंगाई करण्यात येत असणे, यासंपूर्ण प्रकरणात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन महसूल, उद्योग तसेच मुंबई महानगरपालिकेचे बरेच अधिकारी यात गुंतले असल्याचा संशय, याबाबत सखोल चौकशी करुन याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये मौजे कांदिवली (पश्चिम) येथे सुमारे ११६ एकर शासकीय जमिनीपैकी १५० भूखंड औद्योगिक वापरासाठी स्वतंत्रपणे शासन ज्ञापन महसूल व वन विभाग, दिनांक २७/१२/१९८२ अन्वये दिनांक ०१/०१/१९७८ पासून अटी व शर्तीवर कब्जेहक्काने प्रदान केलेले आहेत. तसेच १६ भूखंड सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक ०६/१२/२००२ अन्वये काही अटी / शर्तीवर मौजे कांदिवली - चारकोप, ता. बोरीवली येथील शासकीय औद्योगिक वसाहत उद्योग विभागाकडे हस्तांतरण करुन, भूखंडाचे व्यवस्थापन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे देण्यात आले होते.

तद्नंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे, आदेश क्र. आयईएस-३०३४ ७९७१/ उद्योग-१८, दिनांक ३०/०४/२००४ मधील निर्देशानुसार शासकीय औद्योगिक

९४३



वसाहत, कांदिवलीचे हस्तांतरण कांदिवली को. ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लि. या संस्थेकडे काही अटी व शर्तीस अधिन राहून केले आहे. त्यानुसार दिनांक १२/०५/२००४ रोजी या औद्योगिक वसाहतीचा ताबा कांदिवली को. ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लि. यांना देण्यात आला आहे.

सदर औद्योगिक वसाहतीतील काही भूखंडाचा औद्योगिक वापर वगळून अनधिकृतरीत्या रेस्टॉरंट, बार व इतर व्यावसायिक कामासाठी झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/ दक्षिण विभागाने भूखंड क्र.९१अे व १०९ च्या मालकांवर महानगरपालिकेच्या अधिनियमातील कलम ३५१ अन्वये, व भूखंड क्र.१३ EFGH, १०९ व ९५ च्या भूखंडधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५५ अन्वये तसेच भूखंड क्र.१०८, ९१ CD, ६४ EFGH, ८९AB, १०५ ABC व १४८ CD च्या मालकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नोटीस बजावण्यात आली होती. परंतु महानगरपालिकेच्या या कार्यवाही विरुध्द काही भूखंड धारकांनी मा. न्यायालयात दावा दाखल केल्याने सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच कांदिवली औद्योगिक वसाहत, चारकोप, कांदिवली (प.) येथील भूखंडाकरिता महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने सन २०१३ अन्वये अभिन्यास (Layout) मंजूर केला आहे. या मंजूर अभिन्यासातील भूखंडावरील बांधकामास महानगरपालिकेने इमारत प्रस्ताव विभागाने विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या तरतुदींनुसार औद्योगिक वापराकरीता कांदिवली सहकारी औद्योगिक वसाहत (मर्या.) यांचे ना-हरकत प्रमाणपत्र विचारात घेऊन बांधकामास परवानग्या दिल्या आहेत. तदनंतर, दि.०१/०९/२०१८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मंजूर झाल्याने या विकास नियंत्रण नियमावलीनुसार औद्योगिक वापराचे क्षेत्र, रहिवासी / वाणिज्यिक वारासाठी अनुज्ञेय झाल्याने (Change of User by Industrial to Residential / Commercial) औद्योगिक वसाहती मधील भूखंडाच्या बांधकामासाठी कांदिवली सहकारी औद्योगिक वसाहत, मर्या. यांची “ना-हरकत” (Prior N.O.C.) घेतली जाते. नवीन बांधकाम, पुनर्बांधणी व पुनर्विकास तसेच वापरात बदल इत्यादीच्या परवानगीसाठी जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर जिल्हा) यांच्या ना-हरकतीची अट नामंजुरींच्या सूचना पत्रात (Intimation of Disapproval) समाविष्ट करण्यात येते.

सदर औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या जमिनीचा गैरवापर व विनापरवानगी पुनर्विकास होत असल्याचे निदर्शनास आल्याने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये “सदर औद्योगिक वसाहतीतील भूखंडधारकांना शासनाच्या मान्यतेशिवाय कोणतीही परवानगी देऊ नये.” असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे.

सदरच्या भूखंडाबाबत टी.डी.आर. व अतिरिक्त चटई क्षेत्र वापरास परवानगी मिळणेबाबत तसेच मिळकत भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करुन देणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास अर्ज प्राप्त होत आहेत त्यामुळे कांदिवली इंडस्ट्रियल इस्टेट येथील जमिनीसंदर्भात कशा प्रकारे कार्यवाही करावी, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. सदर बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असून, याबाबत उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२२९३

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तृतीय अधिवेशन

श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर), वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२९३ पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपुर रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ या मार्गावरील रत्नागिरी कोल्हापूर विभागातील रस्त्याचे विस्तारीकरण, चौपद्रीकरण या कामासाठी भुसंपादनाचे काम विशेष भुसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर यांच्यामार्फत सुरु असून करवीर तालुक्यातील प्राधिकरणात असलेल्या गावातील अंतिम निवड करीत असताना येथील जमिनीला देण्यात येणारा भाव हा प्राधिकरणाच्या बाहेर असणाऱ्या जवळच्या गावाच्या दरापेक्षा प्रती गुंठा अडीच ते तीन लाख रुपयांनी कमी असणे, सदर गावे प्राधिकरण क्षेत्रात असल्यामुळे त्यांचे नुकसान झाले असणे, प्राधिकरणाचा कोणताही फायदा या भागांना मिळालेला नाही, तसेच याच रस्त्याच्या भूसंपादनासाठी प्राधिकरणा वाहेरील डोंगराळ व दुर्गम भागातील जमिनीला जादा दर दिला असणे, त्यामुळे उपरोक्त प्राधिकरण क्षेत्रातील या शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यांना देण्यात येणारा मोबदला तूटपुंजा असल्यामुळे त्यांचेवर अन्याय झाला आसणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन सध्याची भौगोलिक परिस्थिती आणि बाजारभाव पाहाता प्राधिकरण हद्दीत समाविष्ट असणा-या करवीर तालुक्यातील प्राधिकरण क्षेत्रात येणाऱ्या गावांतील जमीनीला देण्यात येणारा मोवदला प्राधिकरणाच्या वाहेर असणा-या जवळच्या गावाप्रमाणे देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ च्या रत्नागिरी-कोल्हापूर विभागातील एकूण ७८.१६ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या विस्तारीकरण/चौपदरीकरणाच्या कामासाठी कोल्हापुर ४ तालुक्यामधील ४९ गावांमधील एकूण ३१९.५५ हे.आर. इतके क्षेत्र/जमीन संपादित होत आहे.

त्यासाठी केंद्र शासनाच्या दि.०२.०९.२०१६ रोजीच्या अधिसूचनेअन्वये सक्षम प्राधिकारी भूसंपादन, Competent Authority for Land Acquisition (CALA) म्हणून उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक ०६ यांची नेमणूक करण्यात आली आहे.

नगर विकास विभागाच्या दि.१६.८.२०१७ च्या अधिसूचने अन्वये "कोल्हापूर नागरी विकास क्षेत्र" घोषीत केले असून "कोल्हापूर नागरिक क्षेत्र विकास प्राधिकरण" गठीत करण्यात आले असून त्यात सदर क्षेत्रामध्ये करवीर (३८ गावे) व हातकणंगले (०४ गावे) असे एकूण दोन्ही तालुक्यामधील ४२ गावांचा समावेश होतो. त्यापैकी नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग भूमी संपादनामध्ये करवीर

तालुक्यातील ०५ गावांचा आणि हातकणंगले तालुक्यातील ०२ गावांचा समावेश होतो. सदर राष्ट्रीय महामार्गासाठी "कोल्हापूर नागरी क्षेत्र प्राधिकरण" मध्ये समाविष्ट असलेल्या ०७ गावांमधील एकूण ५४०५६२ चौ. मी. (५.४०.५६२ हे. आर.) क्षेत्र संपादित होत आहे. सदर ०७ गावांमधील एकूण ३५६ सर्व्हे नंबर मध्ये एकूण २९८२ खातेधारक असून त्यात रु.२,६४,८७,१९,५२४/- इतक्या रकमेचे अंतीम निवाडे जाहिर करण्यात आले असून त्यापैकी ७१.४७ % इतके पैसे वितरीत करण्यात आले आहेत. उर्वरीत प्रकरणासंबंधित भूधारकांनी लवाद / मा. उच्च न्यायालय येथे दावे दाखल केलेल आहेत.

सदर भूसंपादनामध्ये करवीर व हातकणंगले तालुक्यातील "कोल्हापुर नागरीक्षेत्र विकास प्राधिकरण' यामध्ये समाविष्ट गावांचे अंतिम निवाडे घोषित करण्यात आलेले असून निवाडा मंजूर करतेवेळी त्यांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रक्कम "राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६" आणि "भूमीसंपादन, अधिनियम, २०१३", मधील कलम २६ ते ३० अन्वये घोषित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.२६ मे, २०१५ नुसार निवाडयांमध्ये प्राधिकरण क्षेत्रामधील रहिवास व वाणिज्य विभागासाठी गुणक १.५ आणि शेती / कृषी विभागासाठी गुणक २ देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे निवाडे घोषित झालेले असून सदर निवाड्यास प्रकल्प संचालक यांचेकडून अंतिम मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रचलित अधिनियम, अधिसूचना यानुसार अंतिम निवाडे घोषित करण्यात आले असून त्यात एकूण रु.२४५,७१,७९,३२५/- इतक्या रकमेच्या नुकसान भरपाई/भूसंपादन मोवदल्याची निश्चिती केली आहे.

सदर निवाडे संबंधित भूधारकास मान्य नसल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार लवादाकडे दाद मागू शकतात.

***************

लक्षवेधी सुचना क्रमांक २३८८

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

अँड . आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३८८ पुढीलप्रमाणे आहे :-

“नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवनी तालुक्यातील नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबत निर्णय घेण्यास होत असलेला विलंब, प्रस्तावित जागा नगर परिषद क्षेत्रात असणे, जमीन अकृषिक असल्याचे कारण सांगुन प्रस्ताव मंजूर करण्यास विलंब होणे, वारंवार दफ्तर दिरंगाईमूळे औद्योगिक क्षेत्र विकसित न होणे, शासनास या विलंबामूळे मोठे आर्थिक नुकसान होणे, वारंवार बैठका होऊन उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय होऊनही Chapter -६ची प्रक्रीया सुरु न होणे, मागील ५० वर्षापासून प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र विकसित न झाल्याने स्थानिक बेरोजगार यांच्या मनात निर्माण होत असलेली नैराश्याची भावना, नागपूर येथील हिंगणा औद्योगिक क्षेत्रात भूखंड उपलब्ध नसणे, एका बाजूला नागपूर या महानगरात शेकडो उद्योजक गुंतवणूक करण्यास इच्छुक असताना शासनाच्या अनास्थेमुळे या विलंबामुळे शासनाचे महसूलाचे नुकसान होणे व आर्थिक उन्नतीला बाधा येणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी रामटेक येथील आमडी व पारशिवनी येथील कन्हान या औद्योगिक क्षेत्राबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता व Package scheme of Incentive देऊन या क्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने व गुंतवणूक शेजारच्या राज्यात जाऊ नये याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया”

मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

ॲड. आशिष जयस्वाल, सन्माननीय विधानसभा सदस्य, रामटेक विधानसभा मतदार संघ यांचे विनंतीनुसार मा.मंत्री (उद्योग) यांनी दि.१५/०९/२०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मौजे आमडी, मौजे नयाकुंड व मौजे चिंचभूवन आणि रामटेक तालुक्यामधील मौजे पटगोवारी येथील क्षेत्राची दिनांक १०/०२/२०२३ रोजी भूनिवड समितीमार्फत सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विप्र) यांचे अध्यक्षतेखाली स्थळपाहणी केली.सदर स्थळपाहणीनुसार नियोजित जागा औद्योगिक क्षेत्रासाठी सुयोग्य असल्याचे दिसून आले.

उक्त प्रमाणे नियोजित जिल्हा नागपूर तालुका रामटेक व पारशिवनी येथील खाजगी ११४८.८१४ हेआर.क्षेत्र, सरकारी ३.३० हे.आर क्षेत्र अशा एकूण ११५२.११४ हे.आर क्षेत्रास म. औ. वि अधिनियमअन्वये १९६१, प्रकरण ६ व कलम २ खंड(ग) च्या तरतुदी लागू करणेस दि.१२/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या १५३ व्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे.त्यानुषंगाने सदर क्षेत्रास म. औ. वि अधिनियम१९६१ प्रकरण ६ व कलम २ खंड(ग) ची अधिसुचना दि.१८/१२/२०२३ रोजी निर्गमित करून औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर केले आहे.

नागपूर जिल्हयातील नागपूर (हिंगणा) औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान मोठे आकाराचे एकूण १७२३ भूखंड आरेखित करण्यात आले असून १६८८ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.तसेच बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण २६८१ भूखंड आरेखित करण्यात आले असून २३४६ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रामध्ये अंदाजे १११.१० हेक्टर जागा वाटपास उपलब्ध आहे.त्याचप्रमाणे बुटीबोरी (टप्पा-२) औद्योगिक क्षेत्रामध्ये १६३ भूखंड आरेखित करण्यात आले असून ४३ भूखंडाचे वाटप करण्यात आलेलेआहे. सदर क्षेत्रामध्ये अंदाजे १२४.२१ हेक्टर जागा वाटपास उपलब्ध आहे व अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रामध्ये ४८४ भूखंड आरेखित करण्यात आले असून २० भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.सदर क्षेत्रामध्ये अंदाजे ९९९.७३ हेक्टर जागा वाटपास उपलब्ध आहे तसेच अतिरिक्त कान्होन औद्योगिक क्षेत्रामध्ये

राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे याकरीता सामुहिक प्रोत्साहन योजना (Package scheme of Incentive ) सन १९६४ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या तालुका वर्गीकरणानुसार ड, ड+ , नक्षलग्रस्त जिल्हे, विना उद्योग जिल्हे व आकांक्षित जिल्हे अशी वर्गवारी असलेल्या तालुक्यामधील उद्योगांना अ,ब,क वर्गीकरण असलेल्या तालुक्यांपेक्षा जास्तीच्या सवलती देण्यात येत असल्यामुळे औद्योगिकदृष्टया अविकसित व ग्रामिण भागात उद्योग स्थापित होण्यास चालना मिळाली आहे. विदर्भातील जिल्हे हे ड+ ,नक्षलग्रस्त जिल्हे, विना उद्योग जिल्हे व आकांक्षित जिल्हे या वर्गवारीमध्ये येतात. त्यामुळे प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार सदर जिल्हयांतील उद्योगांना राज्यातील अ, ब क्षेत्रात मोडणाऱ्या उद्योगांपेक्षा जास्तीची प्रोत्साहने देण्यात येतात. यामध्ये १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, पात्रता कालावधीमध्ये विद्युत शुल्क माफी तसेच प्रति युनिट रुपये १-२ या दराने वीज दर अनुदान सवलत देण्यात येते.

राज्यात उद्योग स्थापन करणे व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी उद्योग विभागामार्फत मैत्री कक्ष कार्यान्वित असून, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणुक सुविधा अधिनियम, २०२३ अन्वये त्यास जास्तीचे अधिकार व कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले आहेत. परिणामी राज्यात जेम्स ॲण्ड ज्वेलरी यासारखे उद्योग स्थापन करणे सुलभ व सोयिस्कर झाले आहे.

५० कोटी वरील गुंतवणुक असलेल्या देशांतर्गत उद्योगांना तसेच विदेशी गुंतवणुकदारांना २० पेक्षा अधिक विभागांच्या १०० हुन अधिक परवानग्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) "महा परवाना" या एक खिडकी प्रणालीव्दारे मुदतबंध कालावधीत देण्यात येत आहेत. या सर्व बाबींमुळे तयार झालेले गुंतवणुक स्नेही वातावरण यामुळे राज्यात येणारे नवे उद्योग व गुंतवणुक राज्यातील सर्व शहरांमध्ये व ग्रामीण भागात तालुका पातळीवरील आद्योगिक वसाहतीमध्ये जाण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता राज्य शासनामार्फत घेण्यात येत आहे.

**************

लक्षवेधी सुचना क्रमांक-१३९९

# महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना
# सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

---

श्री. रवि राणा वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३९९ पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यांचे विद्यमान मंत्री सा.आरोग्य मंत्रालय यांचेकडे स्थानीक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदन तक्रारी विचारात घेऊन जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालयाचे पत्र. क्रं .८१४/२०२३ दि.२१/०६/२०२३ रोजी पत्र पाठवले असणे ज्या मद्ये अमरावती जिल्ह्यातील गणोरी तालुका भातकुली प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकामासाठी निधी मिळणेबाबत तसेच सहसंचालक हि. ह. रो. ज. रो.पुणे- ६ यांचे आस्थापने वरील वैज्ञानिक अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे वेतन तफावत मध्ये सुधारणा करणे व ईतर त्यांचें मागण्या शासणाकडून मंजुर करणे, जि. प. अमरावती येथील आरोग्य सेविका व एल. एच. व्हीं. यांचे मागणी मंजूर करण्यासाठी वरील प्रमाणे पत्र पाठवले जात असणे,अद्यापपर्यंत शासनाकडून वरील प्रस्तावामध्ये कोणताही निर्णय झाला नसणे. यामुळे संबंधिताणमद्ये असंतोष उफाळला असणे, वेळीच शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

---

## प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

अमरावती जिल्हयातील गणोरी ता. भातकुली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकामासाठी निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई या कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्यानुसार १५ वा वित आयोग सन २०२३-२४ या वर्षामध्ये सदर इमारत बांधकामासाठी दि. ०३.११.२०२३ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. या कामास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्र. जा.क्र./जिप/आवि/पासुविक/प्रमा/६०१२/२०२३, दि. ०७.१२.२०२३ अन्वये रु. १४३.०० लक्ष रुपयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत या कामाचे अंदाज पत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे. अंदाजपत्रक तयार झाले नंतर तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया करुन काम सुरु करण्यात येईल. तसेच येथील कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२०२६ मध्ये प्रस्तावित करुन केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे ०६ कार्यालयाच्या आस्थापनेवर प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या संवर्गाची एकूण १६७२ पदे मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीत ८३५ पदे भरलेली आहेत. सदर पदे सरळ सेवेची असून सेवाप्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरती प्रक्रियेद्वारे भरली जातात. या पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पी.बी.-२ (९३००-३४८००) ग्रेड पे ४२०० असून सातव्या वेतन आयोगात पे मॅट्रीक एस-१३ (३५४००-११२४००) अशी आहे. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदास पदोन्नती साखळीतील पुढील पदोन्नतीचे पद आरोग्य पर्यवेक्षक (गट क) असून सदर पदाचे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी पी.बी.-२ (९३००-३४८००) ग्रेड पे ४२०० आहे. व सातव्या वेतन आयोगात पे मॅट्रीक एस-१३ (३५४००-११२४००) अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे यांचे आस्थापनेवर देखील समपदनाम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (गट क) ही पदे मंजूर आहेत. या पदाचे वेतनश्रेणी सहाव्या वेतन

आयोगाप्रमाणे पी.बी.-२ (९३००-३४८००) ग्रेड पे ४२०० आहे. व सातव्या वेतन आयोगात पे मॅट्रिक एस-१३ (३५४००- ११२४००) अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे यांचे आस्थापनेवर देखील समपदनाम प्रयोगशाळा, वैज्ञानिक अधिकारी (गट-क) ही पदे मंजूर आहेत. या पदांचे वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पी.बी.- २ (९३००-३४८००) ग्रेड पे.४२०० आहे.

तथापि, सदर पद परिमंडळ अंतर्गत एकाकी असल्यामूळे सदर पदास पदोन्नती साखळी उपलब्ध नाही. त्यामूळे प्रचलीत शासन नियमानूसार बारा वर्षाच्या सेवेनंतर समूचित ग्रेड वेतन रु.५०० इतकी वाढ देण्याची तरतूद होती. परंतू, दिनांक १.१.२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २.३.२०१९ अन्वये पदोन्नतीची संधी उपलब्ध नसणा-या कर्मचा-यांना आलेली कुंठीतता घालवीणे करिता सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत (१०, २०, व ३०) वर्षाचा नियमित अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर लाभ मंजूर करण्याची योजना अंमलात आलेली आहे. त्यामूळे ज्या पदांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही अशा पदावर कार्यरत कर्मचा-यास लगतची वेतनश्रेणी मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे-०६ या कार्यालयाचे आस्थापनेवरील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदास पदोन्नती साखळीतील पुढील पद आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) आहे. सदर पदावर पदोन्नती झाल्यास पदोन्नतीच्या अनुषंगाने एक मानीव वेतनवाढ दिली जाते. परंतू कर्मचा-याचे मूळ वेतनश्रेणीत बदल होत नाही. आरोग्य पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देण्याची तरतूद सेवाप्रवेश नियमात अंतर्भूत असल्याने विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार कार्यवाही केली जाते.

सदर प्रकरणी शासन स्तरावरुन वित्त विभागास प्रस्ताव सादर केले असता सातव्या वेतन आयोगाच्या समितीसमोर विभागाने उचित प्रस्ताव सादर करावा सद्यस्थितीत वेतन वृध्दी करणे योग्य होणार नाही असा निर्णय शासन मान्यतेने घेण्यात आलेला आहे. तसेच मा.अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ नियुक्त करण्यात आल्याने श्रेणीवाढीचे प्रस्ताव सद्यस्थितीत वित्त विभागाकडून विचारात घेण्यात येत नाही त्यामूळे राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ अन्वये उचित प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. याबाबत वित्त विभागाचे पत्र दिनांक १३ डिसेंबर २०१७ अन्वये कळविण्यात आले आहे.

जिल्हा परिषद आरोग्य सेविका या प्रवर्गाच्या प्रलंबित मागण्या पुर्ण करणेबाबत निवेदन प्राप्त झालेले होते. त्यातील काही प्रमुख मागण्यां पैकी एन.पी.एस. योजना रद्द करुन जुनी पेन्शन लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका यांना पदोन्नती देतांना एल.एच.व्ही. प्रशिक्षणाची अट रद्द करावी, लेखाशिर्ष २२११ व २२१० अंतर्गत मंजूर असलेली व व्यपगत झालेली एल.एच.व्ही ची पदे चालू ठेवावी. तालुका स्तरावर, जिल्हा मुख्यालयामध्ये, प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी दोन एल.एच.व्ही व ए.एन.एम. पदाची स्थापना व्हावी. कायम प्रवास भत्त्यामध्ये वाढ करावी, ५ दिवसांचा आठवडा लागू करावा, कोरोना काळात केलेल्या कामा बाबत त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात या व इतर मागण्यांचे निवेदन प्राप्त झालेले आहेत.

***************

# महाराष्ट्र विधानसभा
## लक्षवेधी सूचना क्रमांक २१६६
## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. देवेंद्र भुयार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१६६ पुढीलप्रमाणे आहे :-

"शासनाचे आरोग्य विभागाकडून राज्यातील रुग्णालयाची यांत्रिकी पध्दतीने बाहयस्त्रोत्राद्वारे स्वच्छता एजन्सी नेमण्यासाठी दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला असणे, सदर निर्णयानुसार शासनाकडून रु.७७/- कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली असणे, तथापि, सदर कामास शासनाकडून पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येणे, तथापि यांत्रिकी पध्दतीने बाहयस्त्रोत्राद्वारे स्वच्छता एजन्सी नेमण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी वित्त विभागाकडून रितसर परवानगी घेण्याबाबत तसेच वाढीव रक्कम अदा करण्याबाबत देखील मंजुरी प्रदान करण्याबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली असणे, दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या रुपये रु.६३८/- कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या निविदेमध्ये १) क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्विस लि. २) ब्रिस्क इंडिया प्रा.लि. ३) बिव्हिजी इंडिया लि. या तीनच कंपन्या सदर निविदेत भाग घेऊन त्यांचा त्याचा लाभ मिळण्यासाठी शासनाकडून सदर वाढीव रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करुन शासन निर्णय काढण्यात आल्याचा व्यक्त होत असलेला संशय, त्यामुळे गरज नसतांना रुपये ६३८ कोटी रक्कमेची सुप्रमा दिल्यामुळे शासन निधीचा झालेला अपव्यय व त्यामध्ये शासकीय अधिकारी सामील असल्याचा होत असलेला संशय व त्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२१/प्र.क्र.०७/आरोग्य-३, दि.०२/०३/२०२१ अन्वये स्वच्छता सेवेची निविदा प्रक्रिया जिल्हा स्तरावरुन राबविण्याबाबत प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानुसार परिमंडळांतर्गत विविध रुग्णालयामध्ये स्वच्छता सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतात. सार्वजनिक आरोग्य सेवा अंतर्गत राज्यातील विविध रुग्णालयांना स्वच्छता विषयक सेवांचा दर्जा उंचावण्याची आवश्यकता असल्याने, त्याच प्रमाणे दि. १४/०७/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये National Accreditation Board For Hospitals Providers Healthcare (NABH) अंतर्गत संस्थंचे मानांकन होण्यासाठी स्वच्छता सेवेबाबत अधिक कार्यक्षम रहाणे आवश्यक ठरविले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली एकुण २५०३ आरोग्य संस्थां आणि बाह्य परिसरांची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता हे काम एकल बाहयंत्रणेव्दारे तांत्रिक पध्दतीने स्वच्छता सेवा (Mechanized Cleaning Services) करण्यासंबंधी शासनाने रु.६३८ कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. दि.१४/०७/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये National Accreditation Board For Hospitals Providers Healthcare (NABH) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये स्वच्छतेकरीता महत्वाचे पालन करण्यात आलेले आहे. समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यारंभ आदेश क्र.सकआ/आस्था-६/प्र.क्र.३/बहास्त्रोत/क्रिस्टल/पुआ/सन २०१८-१९ / ६१७, दि.८.०३.२०१९ अन्वये शासनाने सन २०२३ मध्ये राज्यस्तरावरील आरोग्य संस्थांचे वापरात असलेले अंदाजित क्षेत्रफळ विनावापर असलेल्या जागेचे क्षेत्रफळ विचारात घेवून, वापरात असलेल्या क्षेत्रफळाकरीता रु.८४/- प्रती स्क्वेअर मीटर या प्रमाणे व विना वापर असलेल्या क्षेत्रफळाकरीता रु.९.४०/- प्रती स्क्वेअर मीटर या प्रमाणे अंदाजित दर घेऊन अंदाजित दर काढण्यात आले होते. नव्याने सुरु झालेली रुग्णालये तसेच श्रेणीवर्धन झालेल्या रुग्णालयांचा समावेश सदरहू प्रशासकिय मंजूरी आदेशात समावेश केल्याने रुग्णालयीन प्रति स्क्वेअर मीटर वापरात असलेले क्षेत्रफळ यानुसार व निविदा दर ठरविण्यात आले आहे, त्यामुळे अनावश्यक वाढ झालेली नाही.

**********************

सभालक्षवे-२०२३/प्र.क्र.२०५/आरोग्य-३

लक्षवेधी सूचना क्र. २१८०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तिसरे(हिवाळी) अधिवेशन

श्री. देवेंद्र महादेवराव भुयार मा. विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१८० पुढीलप्रमाणे आहे :-

"शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यस्तरीय वाहनचालक पुरवठा व आहारसेवा पुरवठा या टेंडरमध्ये खोटे तांत्रिक कागदपत्रे व अनुभव प्रमाणपत्र यशोधरा महिला औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्यादित नाशिंक आणि राजश्री शाहू नागरी सहकारी संस्था, पालघर या संस्थांनी सादर करुन निविदा मिळविलेल्या असणे, तथापि सदर बनावट प्रमाणपत्रांची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाने टेंडरमधील अटी व शर्ती तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाई केली नसल्यास, विलंब का करण्यांत आला याबाबत संभ्रमावस्था असणे, तसेंच सदर फसवणुकीचा प्रकार उघडकीस येणे, त्यानंतर याप्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई यांनी दोन्ही संस्थांचा अनुभव प्रमाणपत्र व कागदपत्रांची तपासणी करुन आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्यभवन, मुंबई यांना अहवाल सादर करण्यांत आलेला असणे, परिणामी शासनाने याप्रकरणी चौकशी करुन संबंधित संस्था व अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.

वाहनचालक पुरवठयाबाबत राज्यात एकूण १८ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्याव्यतिरिक्त मे. यशोधरा महिला औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्यादित नाशिक आणि राज़श्री शाहू नागरी सहकारी संस्था, पालधर यांचे काही कागदपत्र योग्य नसल्याने त्यांचे पुरवठा आदेश दिनांक ०८.११.२०२३ रोजी रद्द करण्यात आले होते.

आहार सेवेबाबत प्राप्त तक्रारीनुसार कागदपत्रांची पुन:श्च तपासणी करण्यात आली. तसेच केंद्रीय खरेदी समितीच्या निर्देशानुसार विधि आणि वित्त शाखेचे अभिप्राय घेण्यात आले. तसेच अभिप्रायानुसार दोन्ही संस्थांना अंतिम नोटीस देण्यात आली आहे. उत्तर प्राप्त करुन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

****************

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे हिवाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.३८४**

श्री.रविंद्र वायकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३८४ पुढीलप्रमाणे आहे :-

"जोगेश्वरी पूर्व येथील शिवटेकडी, प्रतापनगर, दत्तटेकडी, दुर्गानगर हा भाग ना विकास क्षेत्रामधून वगळून २०२४ च्या विकास आराखडयात या भागाचा समावेश रहिवाशी क्षेत्रात होणे, या भूखंडावर ६० वर्षापासून राहणा-या झोपडीधारकां झोपुयो राबविण्याची मागणी, लोकप्रतिनिधिंनी संबंधित विभागाकडे व शासनाकडे सातत्याने केलेला पत्रव्यवहार, सदर भूखंडावर एसआरए योजना राबवून झोपडीधारकांचे पुनर्वसन गरज, त्याच बरोबर न.भू.क्र. ८१ ते १३२ मौजे मजास मेघवाडी ही ६५ वर्षापासून लोकवस्ती अस्तित्वात असणे, सदर भूभाग हा विकास नियोजन आराखड्यात मनोरंजनाचे मैदान व उद्यान साठी आरक्षित असल्याने विकास रखडणे, सन २००५ मध्ये झालेल्या पूरसदृश परिस्थितीचा या भागास मोठा तडाखा बसलेला असणे, या भूखंडावर भूधारक मालकांची संख्या ही जास्त असल्याने खेळाचे मैदान, मनोरंजनाचे मैदान या धोरणात्मक आरक्षणात असल्याने झोपडपट्टीच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित, विकास नियोजन आराखडा २०१४-३४ मध्ये ज्या भागात झोपडपट्टीवस्ती आहे परंतु त्या भूखंडावर जर इतर आरक्षणे असल्यास ज्यामुळे त्या झोपडपट्टीचा पुनर्विकास होणे शक्य होत नसेल त्या भूखंडावरील झोपडीधारकांना पुनर्वसनाचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून सदर आरक्षित भूखंडावरील ६५ज्ञ् भूभाग हा रहिवाश्यांसाठी अर्थात विकासासाठी व उर्वरित ३५ज्ञ् भूभाग हा त्यात असलेली आरक्षणे कायम ठेवण्याचा निर्णय अश्या भूखंडावर वसलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसनाच्या होणे शक्य, सर्व झोपडयांचा पुनर्विकास कामी शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

जोगेश्वरी (पूर्व) येथील शिवटेकडी, प्रतापनगर, दत्तटेकडी, दुर्गानगर या भागामध्ये शासनाने झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन होण्याबाबत विकास आराखडा, २०३४ मध्ये सदर ना-विकास क्षेत्रामधील (NDZ) बहुतांश क्षेत्राचे निवासी क्षेत्र म्हणून आरक्षणात बदल केलेला आहे. तथापि, सदर भूखंडाचे मालक/विकासक/संस्था यांचेमार्फत या ठिकाणी झोपु योजना राबविण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर

व भारतीय पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

तसेच न.भू.क्र. ८१ ते १३२ मौजे मजास, मेघवाडी येथील भूभाग हा विकास नियोजन आराखडयात मनोरंजनाचे मैदान व उद्यानाकरीता आरक्षित आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम १७ (३) (ड) नुसार ६५ १% भूभाग रहिवाश्यांसाठी अर्थात विकासासाठी व उर्वरीत ३५% भाग असलेली आरक्षणे कायम ठेऊन झोपडपट्टीधारकांचा पुनर्विकास होणे शक्य आहे. याबाबत सदर भूखंडाचे मालक विकासक/संस्था यांचेमार्फत झोपु योजना राबविण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

*********

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे हिवाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.१३९२**

श्री. सुनिल राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" मुंबई उपनगर जिल्हा बोरिवली येथील अनेक सरकारी जमिनीवर झोपडपटया मोठया प्रमाणावर असणे, सदर झोपडपटयांबाबत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अंतर्गत झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे, त्यामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची पात्रता आणि योजनेचा मिळणारा लाभ याबाबतची निश्चिती करणे, बोरिवली, चारकोप, कांदिवली या ठिकाणी म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या अनेक सोसायटयांना देण्यात आलेले भूखंड तसेच दिलेल्या भूखंडावर केलेल्या बांधकामाची स्थिती/लोकसंख्या त्यामुळे सार्वजनिक व्यवस्था जसे पिण्याच्या पाण्याची जिर्ण झालेली पाईपलाईन, सांडपाणी वाहिन्यांची झालेली जिर्ण अवस्था, त्याचप्रमाणे कचरा वर्गीकरणाचे सुरु न झालेले प्रकल्प, अरुंद रस्ते अशा कात्रीमध्ये सापडलेल्या नागरीकांना दिलासा देऊन राहण्याजोग्या सुविधांबाबत आराखडा मंजूर करण्याची आवशक्ता, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई उपनगर, जिल्हा बोरीवली अंतर्गत महानगरपालिकेचे पी/दक्षिण, पी/उत्तर, आर/उत्तर, आर/दक्षिण व आर/मध्य हे प्रभाग आहेत. सदर प्रभागातील साकारी जमिनीवर (शासनाच्या, महानगरपालिकेच्या व म्हाडा प्राधिकरणाच्या मालकीच्या) एकूण २७७ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पांमध्ये एकूण ८३८७२ झोपडीधारकांच्या सदनिका बांधवयाच्या आहेत. त्यापैकी २१२७१ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देऊन त्यामध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे व उर्वरित सदनिकांचे काम सुरु आहे.

झोपडपट्टीधारकांची पात्रता / अपात्रता निश्चित करुन परिशिष्ट-२ कालबध्दरित्या पुर्ण होण्याच्या दृष्टिने दि. १४.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांच्या अधिपत्याखाली १० सक्षम प्राधिकारी यांची केंद्रीकृत यंत्रणा करण्यात आली आहे. तसेच झोपडीधारकांचे बोयोमेट्रिक सर्वेक्षण लवकरात लवकर होण्याच्या दृष्टिने निवेदेव्दारे नव्याने ४ संस्थांची नेमणूक केली आहे. याव्यतिरिक्त झोपडीधारकांची पात्रता जलद गतीने निश्चित करण्याकरीता व कामामध्ये पारदर्शकता आणण्याकरीता स्वयंचलित परिशिष्ट-२ प्रणाली (Auto Annexure-II) तयार करण्याचे काम सुरु आहे.

बोरीवली, चारकोप, कांदिवली म्हाडाच्या अभिन्यासातील वसाहतीतील रहिवाशांना हे भूखंड सन १९८५ ते १९९५ मध्ये वितरीत करण्यात आलेले असून, सदरील म्हाडाच्या अभिन्यासात असलेल्या

पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, साडपाणी वाहिन्या, कचरा वर्गीकरण व रस्ते हे महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत.

मुंबई उप नगरातील कांदिवली (प.) येथील चारकोप सेक्टर-१ व २ तसेच आर-मध्य विभागातील कांदिवली (प.) सेक्टर-३ ते ९ गोराई १, २, व ३ चा संपूर्ण परिसर हा म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो. नगर विकास विभागाच्या दि.२३.०५.२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये या क्षेत्रासाठी म्हाडाची सुकाणू अभिकरण (Nodal Agency) म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ११४ अभिन्यासाची अनुसूचित दर्शविलेल्या ठिकाणी विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर-दक्षिण व आर/मध्य विभाग क्षेत्रातील म्हाडा क्षेत्रातील नागरीकांना जुन्या मंजूर अभिन्यासाप्रमाणे पाणी पुरवठा करणे व कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याची विल्लेवाट लावणचे काम महानगरपालिकेव्दारे नियमित करण्यात येते. आर/मध्ये विभागामध्ये विकास नियोजन आराखडयामधील अंतिम भूखंड क्र.३८२, टी.पी.एस-०३, बोरिवली (पश्चिम) हा भूखंड घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत सुविधेसाठी आरक्षित असून सदर ठिकाणी कचरा वर्गीकरणाचा प्रकल्प सन २०१८ पासून कार्यान्वित आहे. तसेच म्हाडा अभिन्यासातील ज्या रस्त्यांची व जिर्ण झालेल्या जलवाहिन्या, मलनि:सारण वाहिन्यांची डागडुजी महानगरपालिकेव्दारे करण्यात येते. तसेच रस्ते विभागामार्फत सुरु असलेल्या कामादरम्यान आवश्यकतेनूसार जीर्ण झालेल्या जलवाहिन्या व मलनि:सारण वाहिन्या दुरुस्तीचे काम करण्यात येते.

पश्चिम उपनगरातील बोरिवली, चारकोप, कांदिवली या ठिकाणावरील म्हाडाने विकसीत केलेल्या परिसरातील लोकसंख्येची वाढ व परिसरातील इमारतींचा होणारा विकास लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण मलवाहिन्या महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्प विभागामार्फत वृध्दिंगत करण्यात येतात. त्यानूसार चारकोप (काडसिध्देश्वर मार्गावरील चारकोप पम्पिंग स्टेशन) येथील म्हाडाने विकसीत केलेल्या परिसरातील महानगरपालिकेच्या रस्त्यांमधून १२०० मिमी व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्या वृध्दिंगत करण्यात आल्या आहेत. तसेच गोराई दोन विभागामध्ये आरएससी-३७ मार्गावर मंगलमुर्ती हॉस्पिटल ते ग्लोबल पिल्लई इन्स्टिटयुटपर्यंत अतिरिक्त नवीन ६०० मिमी व्यासाची मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

पश्चिम उपनगरातील बोरीवली, चारकोप, कांदिवली या ठिकाणावरील व इतरही म्हाडा अभिन्यासांमध्ये टाकण्यात येणाऱ्या/परिवर्धित करण्यात येणाऱ्या मलनि:सारण वाहिनींचा अभ्यास, विश्लेषण, योजना, आराखडा, अंदाजपत्र व निविदा तयार करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्याची प्रक्रिया मलनि:सारण प्रकल्प खात्याकडून सुरु असून सदर कामाचे मसुदापत्र प्रशासकाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहे.

*******************

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

डॉ.देवराव होळी वि.स.स यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १६९४

" गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुल च्या पहिल्या टप्प्यातील कामाची १३ ऑगस्ट २०१९ रोजी २४ कोटी ३१ लक्ष रुपयाची निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन १८ महिन्याचा कालावधीत निश्चित करुन बांधकाम सुरु होणे, परंतु सदर कामाची प्रगती खुपच मंद असल्याने ३४ महिन्याचा कालावधी नंतरही वापरासाठी हस्तांतरीत होई पर्यंत कोणतीही इमारत पुर्ण न होणे. १८ महिन्याच्या कालावधीनंतर दररोज ५०० रुपये कमी दंड असल्याने कंत्राटदाराने आजुनही मनुष्यबळ व यंत्रसामुग्री त्यात गुंतवलेली नसणे, १ जून २०२३ पासुन दररोज ५००० रुपये दंड रक्कम ठोठावूनही कंत्राटदार कोणत्याही पत्राचे पालन करण्यास प्रतिसादर न देणे, कंत्राटदाराला फक्त कामे करण्यात व निकृष्ट दर्जाची कामे करण्यास रस असून जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ साठीही त्यांनी अशास प्रकारचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याने या कंत्राटदारला काळया यादीसाठी नोटीस बजावलेली असणे. सदर कंत्राटदार मनमानी पध्दतीने काम करीत असून यास कंत्राटदाराकडुन काम राहिल्यास सदर काम पुर्ण होणे शक्य नसणे केलेल्या कामाची गुणवत्ता तपासून सदर कंत्राटदाराला काळे यादीत टाकण्याची आवश्यकता. सदर कंत्राटदाराची निविदा प्रक्रिया रद्द करुन पुढील उर्वरित कामासाठी नविन निविदा प्रक्रिया राबवून दुस-या कंत्राटादाराला देण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ."

---

मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

जिल्हा क्रीडा संकुल, गडचिरोली च्या बांधकामासाठी रु. २४१५.१४ लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देवून रु. ८००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतुन सोनापुर कॉम्पलेक्स येथे जलतरण तलावाचे बांधकाम, मौजा रामपुर तुकुम येथे क्रीडा वसतीगृहाचे बांधकाम व इतर क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरीता रु. ३००.०० लक्ष एवढा निधी खर्च झालेला आहे. मौजा लांझेडा सर्वे क्र. १७०१ मधील ६.२६ हेक्टर आर. जमिनीवर आधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरीता दि. ११.०६.२०२० अन्वये रु. ४४१०.५७ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास सुधारित मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचिरोलीमार्फत संकुलाच्या प्रथम टप्प्यातील रु. २७.४४ कोटींची कामे (अग्रीमेंट रेट रु.२६९०.९८ लक्ष ) करण्यात येत असून, त्यामध्ये प्रशासकीय इमारत जिम हॉलसह, इनडोअर बॅडमिंटन हॉल (४ कोर्ट), डोम टाईप मल्टीगेम इनडोअर हॉल, ४०० मीटर सिंथेटीक धावनपथ, प्रवेशद्वार, पार्किग एरिया, विद्युतीकरण इ. कामांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात २००० क्षमतेसह रु. १७.५९ कोटीची गॅलरी बैठक व्यवस्था, जलतरण तलाव, उर्वरीत वॉल कंपाऊंड, पाणी व्यवस्था, बाह्य विद्युतीकरण, आऊट डोअर, विविध खेळांची मैदाने इ. कामांचा समावेश आहे. यासाठी आदिवासी विभाग, भारत सरकार यांचेमार्फत रू. १५६८.०० लक्ष इतका निधी मंजूर झालेला असून, त्यापैकी रू. ४५७.५० लक्ष निधी प्राप्त झाला आहे.

कार्यारंभ आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम पूर्ण होऊन जिल्हा क्रीडा संकुल समितीस अद्याप हस्तांतरीत झालेले नाही. त्यामुळे १८ महिन्यांचा विहित कालावधी पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदारावर रु.५००/- प्रती दिन व जुन २०२३ पासुन प्रती दिन रु.५०००/- इतका दंड बजावण्यात आला आहे. संकुलाच्या दि.१२.०९.२०२३ च्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा उपाध्यक्ष जिल्हा क्रीडा संकुल समिती, गडचिरोली यांनी प्रथम टप्प्यातील कामे तातडीने पुर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुलाच्या बांधकामाबाबत दिनांक १८/१२/२०२३ रोजी नागपूर येथे बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत बांधकामाची प्रगती , निधी , कामाची गुणवत्ता, व कंत्राटदाराविरुध्दची कारवाई यासंदर्भात आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले असून त्यानुसार संकुलातील कामे प्रगतीपथावर आहेत.

***********.